# महाराष्ट्राच्या राजकारणातील शिवसेनेचे बदलते स्वरूप

प्रा.डॉ.कमलाकर एन. राक्षसे
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.

## प्रस्तावना

जगातल्या अनेक देशांनी लोकशाहीचा स्विकार केलेला आहे. यामध्ये प्रत्यक्ष लोकशाही असो की प्रातिनिधिक लोकशाही असो लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष महत्त्वाची भूमिका बजावित असतात. भारत तर बहुपक्षपद्धती असलेला देश आहे. भारत हा देश इतर देशापेक्षा वैविध्यपूर्ण असलेला देश आहे. त्यामुळे भारताच्या राजकीय जीवनात नवनवीन राजकीय पक्ष उदयाला आलेले दिसतात. यामध्ये महाराष्ट्रात शिवसेनेसारख्या पक्षाचा समावेश होतो.

खरे तर 1990 च्या दशकानंतर देशात नवनवीन राजकीय पक्ष उदयाला आले असले तरी शिवसेना नावाचा राजकीय पक्ष सत्तरच्या दशकात उदयाला आला आहे. शिवसेनेची स्थापना महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाच्या व्यापक सामाजिक आधारांना खिंडार पाडण्यासाठी झाली. याच्यातून शिवसेनेचा विस्तार होत गेला आहे. मुंबईतील मराठी माणूस 1963 पासून त्यांची गाऱ्हाणी घेऊन बाळ ठाकरेंना भेटायला येवू लागला. त्यांच्या मनामध्ये मराठी आहे म्हणून मला नोकरी व रोजगाराच्या संधी नाकारल्या जात आहेत अशी भावना विकसीत व्हायला लागली. परिणामी मराठी लोकांची एक संघटना असावी असे लोकांनाही वाटू लागले होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळ ठाकरेंना सांगितले की, हे एवढे मराठी लोक येतात याला काही ऑर्गनाईज्ड स्वरूप द्यायचं वा नाही?[1]

प्रबोधनकार ठाकरेंना वाटायचं की मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी प्राणपणाने झुंजणारी संघटना काढणं हाच एक मार्ग आहे.[2]

19 जून 1966 रोजी मुंबईत शिवसेनेची स्थापना झाला. मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एक संघटना स्थापन करीत असल्याचे प्रतिपादन मे 1966 च्या अंकात केले. एकंदरीतच शिवसेनेचा पाया मराठी तरुणांसाठी लढणे या विचार प्रणालीच्या पार्श्वभूमीवर रचला गेला. परंतु शिवसेनेच्या विचार प्रणालीमध्ये अनेकवेळा बदल झालेले पहावयास मिळतात. सिद्धांत आणि व्यवहार यात अंतर जाणून येते. अर्थातच शिवसेनेच्या मुळ मुखड्यात झालेले बदल यावर सदर संशोधन पेपरमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोनातून प्रकाश टाकण्यात आला आहे. सदर संशोधन पेपर लिहिण्यासाठी माहितीचा स्त्रोत हा दुय्यम साधने हा आहे.

प्रबोधनकारांनी सांगितल्याप्रमाणे मराठी माणसांसाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी शिवसेना नावाची एक लढाऊ संघटना स्थापन झाली. प्रारंभीच्या काळात शिवसेना एक संघटना होती. 20 जूनच्या मार्मिकच्या अंकामध्ये शिवसेना संघटनेचे बोधचिन्ह म्हणून डरकाळी फोडणारा वाघ छापण्यात आला होता आणि सोबत शिवाजी महाराज आणि मागच्या बाजूला महाराष्ट्राचे चित्र आणि मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे वचन लिहिले होते आणि मोठ्या अक्षरात शिवसेना असे नाव छापलेले होते. सोबत भगवा ध्वज होता. हे येथे मी मुद्दामहून नमूद

करत आहे. कारण त्याचे विश्लेषण आपण पुढे करणार आहोत. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या व्यापक जनआंदोलनानंतर 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. या आंदोलनात मराठा अस्मिता, मराठ्यांचा इतिहास आणि शिवाजी महाराजांची प्रतिमा यांचा मराठी माणसांच्या जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आलेला होता. पण महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ही समिती विसर्जित झाली. याच प्रमिता व अस्मितांचा वापर मोठ्या खुबीने बाळ ठोकरे यांनी केला. शिवसेनेने सुरुवातीच्या काळात मोठ्या प्रमाणात नोकरी, व्यापार, कामधंद्यांच्या निमित्ताने दक्षिणात्य लोक मुंबईत आले होते. त्यांच्या विरोधात शिवसेनेने जोरदार प्रचार केलेला होता. त्याला मराठी माणसांकडून वाढता प्रतिसाद मिळाला. शिवसेना स्थापनेच्या वेळेस बाळ ठाकरेंनी असे सांगितले की, शिवसेना 80% समाजकारण व 20% राजकारण करेल. ते असे ही म्हणले की, ‘‘राजकारण म्हणजे गजकरण आहे.’’[3]

शिवसेनेने नंतरच्या काळात म्हणजेच चार दशकाच्या वाटचालीत छापील शब्दाकडे तिरस्कार आणि हेटाळणीनेनेच पाहिले. मुंबईत जो काही मराठी व्यक्तीवर अन्याय झाला त्याला वाचा फोडण्यासाठी मार्मिकच्या माध्यमातून काम केले. मार्मिकमध्ये धारदार लेखन केले जाई आणि बोचऱ्या लिखाणामुळे मराठी समाजाचा जो असंतोष खदखदत होता तो मार्मिकच्या माध्यमातून व्यक्त केला जाई. शिवसेनेच्या स्थापनेनंतर म्हणजेच साधारणतः दोन दशके मुंबई आणि ठाणे या दोन शहरातच शिवसेनेची कार्यकक्षा होती. शिवसेनेने ठाणे नगरपालिकेची निवडणूक जिंकल्यानंतर 1985 मध्ये मुंबई महापालिकेवर संघटनेचा एक हाती झेंडा फडकविल्यानंतर शिवसेनेने आपले हातपाय राज्याच्या अन्य भागातही पसरवायला सुरुवात केली. अर्थातच शिवसेनेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने अतिशय योजनाबद्ध हालचाली सुरू झाल्या होत्या.

**हिन्दुत्वाच्या मुद्द्यांच्या अनुषंगाने...**

कोणत्याही राजकीय पक्षाची वाढ किंवा विस्तार त्या पक्षाने तयार केलेल्या ध्येय धोरणावर अथवा कार्यक्रमावर अवलंबून असते. आपण मागच्या परिच्छेदामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे शिवसेनेची प्रारंभीची भूमिका मराठी माणसांचे हित एवढीच होती. परंतु मुद्दा मुंबई व इतर महानगरापुरता मर्यादित होता असे म्हटले असले तरी ही शिवसेनेने ‘मराठी माणूस’ ही भूमिका बदलून 1972 नंतर हिन्दुत्वाचा मुद्दा आणला. यानंतर शिवसेनेने मराठी माणसांचा प्रश्न बाजूला सारून हिन्दुत्वाला महत्त्व देणे सुरू केले. शिवसेनेचे हिन्दुत्व मग जहाल होते, कडवे होते वगैरे. शिवसेनेचे 1984 मध्ये पहिले अधिवेशन मुंबईत भरले होते याच अधिवेशनात राज्यभर शिवसेनेचा विस्तार करण्याच्या निर्णयावर ठराव झाले. याच सुमारास शिवसेना हिन्दुत्वाच्या विचारांचा पाठपुरावा करू लागली. तसेच 1984 मध्येच हिन्दू महासंघाची कल्पना मांडली होती. या कल्पनेकडे अनेक हिन्दू संघटनांनी दुर्लक्ष केले. 1985 च्या महाड अधिवेशनात शिवसेनेच्या हिन्दुत्ववादी भूमिकेवर शिक्का मोर्तब झाले आणि 1987 पासून शिवसेनेच्या अजेंड्यावर हिन्दुत्व अग्रक्रमाने आले होते. शिवसेनेनी 1987 ला मुंबईतील पोट निवडणूक हिन्दुत्वाच्या मुद्द्यावर लढविली होती. शिवसेना विजयी झाली होती. हळूहळू बाळासाहेब ठाकरे हिन्दुरक्षक म्हणूनही पुढे आले होते. ‘शिवसेनेचे हिन्दुत्व हेच राष्ट्रीयत्व’ या विषयावर बाळ ठाकरे यांनी व्यक्त केलेल्या विचारातून त्यांचे हिन्दुत्व अधिक लक्षात येईल. ठाकरे यांच्या मनात हिन्दुविषयी ममत्व असल्यामुळे अन्य धर्मियांविषयी त्यांच्या मनात सहिष्णुतेची भावना नव्हती. त्यामुळे

मुस्लिमांबरोबर ख्रिश्चन समाजाला व दलित समाजाला हिणवण्याची मिळालेली संधी त्यांनी गमावली नव्हती. या एकंदरीतच मुद्द्यांच्या बाबतीत शिवसेनेने मराठीचा मुद्दा बाजूला करत हिन्दुत्व स्विकारलेले आहे.

**शिवसेनेने मराठी अस्मितेला बगल दिली.**

सामान्यतः बहुतेत प्रादेशिक पक्षांचे कार्यक्षेत्र विशिष्ट राज्यापुरतेच मर्यादित असते. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणात प्रादेशिकवाद हा प्रभावी घटक मानला गेला आहे.

डॉ. इक्बाल नारायण म्हणतात की, 'भारतीय राजकारणाचे एक प्रमुख निर्धारत तत्व म्हणजे प्रादेशिकवाद होय.'[4]

प्रादेशिकवादाला प्रमाण मानून भारतात अनेक राजकीय पक्ष उदयाला आली आहेत. उदा. अंध्रात तेलगू देसम, तामिळनाडूत द्रमूक आणि अण्णाद्रमुक, पंजाबमध्ये अकाली दल याच राजकीय प्रक्रियेचा भाग म्हणून महाराष्ट्रात शिवसेनेचा उदय साहजिकच आहे. परंतू शिवसेनेने हिन्दुत्वाचा मुद्दा स्विकारून अथवा उचलून धरून मराठी अस्मितेला जाणीवपूर्वक फाटा दिलेला दिसतो. जे की इतर प्रादेशिक पक्षात असे मुद्दे कधीही स्विकारले नाहीत.

**भूमिपुत्र सिद्धांताची ऐसी की तैसी**

भारतात एकेरी नागरिकत्वाची तरतूद भारतीय संविधानात आहे. तरी सुद्धा प्रांताप्रांतामध्ये भेदभावाची भावना विकसित झाली आहे. महाराष्ट्रात शिवसेना या सिद्धांतानुसार जन्माला आली. शिवसेनेच्या 5 जून 1966 च्या अंकात एक चौकट प्रसिद्ध झाली. त्यामध्ये असे नमूद केले होते की, यंडूगंडूचे मराठी माणसाच्या हक्कावरील आक्रमण परतवून लावण्यासाठी शिवसेनेची लवकरच नोंदणी सुरू होणार! विशेष माहितीसाठी मार्मिकचा पुढील अंक पहा. 1966 पासूनच मार्मिकच्या माध्यमातून दक्षिणात्यांना विरोध केला गेला. 'बजाव पुंगी - हटाव लुंगी' अशी जहाल घोषणा देण्यात येत होत्या. परंतू नंतरच्या काळात शिवसेनेकडून अनेक अमराठी लोकांना लोकसभा-राज्यसभा निवडणुकीची तिकीटे देवून त्यांना निवडूनही आणले गेले. यामध्ये नंदी, केनिया, निरुपम, जेठमलांनी इ. नावे घेता येतील. म्हणूनच शिवसेनेने भूमिपुत्रांचा सिद्धांत येथे डावलला आहे, असे दिसते.

**शिवसेनेचा दलित विरोध आणि शिवशक्ती आणि भीमशक्ती**

शिवसेनेचा दलित विरोध सर्वश्रृत आहे. विशेष करून महाराष्ट्रातील नवबौद्ध समुदायाला शिवसेनेने विरोध केल्याचे दिसून येते. शिवसेनेने मराठवाड्यात विस्तार करण्यासाठी तेथील दलित (नवबौद्धांना) विरोध केला होता. बहुजन विरूद्ध दलित या तेथील परंपरागत संघर्षाचा मोठ्या चलाखीने वापर करून घेण्यात आला होता. त्यासाठी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरास विरोध हा सेनेने एक प्रमुख मुद्दा केल्याचे दिसून येते. शिवाय मराठवाड्यात फार मोठ्या संख्येने असलेल्या बिगर दलित वर्गाला आकर्षित करून घेण्यासाठी शिवसेनेनी गायरान जमिनीच्या प्रश्नाचाही वापर केलेला दिसून येतो. तत्पुर्वी 1974 ला दलित पँथर्सची भूमिका शिवसेनेला पटली नाही. म्हणून येथूनच संघर्षाला सुरुवात झाली. राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज.वि. पवार इ. पँथर्स नेते आणि शिवसेना यात मोठा संघर्ष झाल्याचे दिसून येते. दलितांमध्ये नवबौद्धांचे प्रमाण मोठे होते. शिक्षणाचा प्रसार आणि लढाऊ बाण्यामुळे हा वर्ग मोठ्या वेगाने प्रगती करत होता. शिवसेनेने त्यांच्या विरोधात दलितामधील चर्मकार व मातंग या समाजाला जवळ करण्याचा प्रयत्न शिवसेनेने केल्याचे दिसून येते. शिवसेनेने 'मराठी माणूस' हा सोयीचा विषय घेऊन ठाणे-

मुंबई पुरते राजकारण करत राहिली. दलित समाज आणि शिवसेना एकमेकांच्या विरोधात उभी राहिली. मराठवाड्यात आपले बस्तान बांधण्यासाठी दलितविरोधी भूमिका घेऊन शिवसेना मराठवाड्यात पसरत गेली. याच काळात इतर मागासवर्गीयातले नेते छगन भुजबळ आघाडीवर होते. अशा पद्धतीने राखीव जागा, नामांतर आणि रिडल्स, गायरान जमिनीच्या मुद्दयावरून शिवसेनेने दलितांना विरोध करणे चालूच ठेवले. भडक भाषणातून जनभावना चेतवून लोकनुरंजनाचे राजकारण करणे ही शिवसेनेची जमातवादी भूमिका होती.[5]

1973 साली मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेने रिपब्लिकन पक्षाशी युती केलेली होती. बाळ ठाकरेंनी शिवशक्तीला भीमशक्ती येवून मिळत आहे याबद्दल आनंद व्यक्त केला होता. तशा पद्धतीचे व्यंगचित्रही मार्मिकमध्ये छापून आपले होते. शिवशक्ती व भीमशक्ती बद्दल म्हणाले होते की, ''ही युती केवळ दोन पक्षाची नाही. रिपब्लिकन हे सामाजिक दलित आहेत तर आम्ही राजकीय दलित आहोत, अशा संघटनाची युती आहे.'' एकंदरीत याबाबतीत शिवसेनेने प्रसंगानुरुप आपली भूमिका दलितांबद्दलची बनलेली दिसून येत आहे.

**शिवसेनेचा मुस्लिम विरोध आणि मुस्लिम लीगशी युती**

शिवसेनेच्या वाटचालीत दंगलीचे दिवस अनेकदा आले. शिवसेनेच्या राजकीय प्रवासात प्रत्येक दंगल ही जातीय दंगल होती. शिवसेनेने कधी दलितांना (नवबौद्धांना) तर कधी मुस्लिमांना टारगेट केल्याचे पहावयास मिळते. महाराष्ट्रात अनेकदा जातीय दंगली झाल्या. दंगलीच्या समयी शिवसेना हिंदू समाजाच्या पाठिशी राहिली होती. हिंदू समाजाने केलेल्या प्रत्येक कृतीचे समर्थन शिवसेना करीत होती. उदा. दुर्गादेवीच्या मंदिराचा वाद, बाबरी मशिद विध्वंसाचा प्रसंग यामध्ये शिवसेना हिंदूच्या बाजुने होती. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना' या वृत्तपत्रातून मुस्लिमांना टारगेट केले जाई. एकीकडे असा विरोध दर्शविणे आणि दुसरीकडे मात्र 1979 साली शिवसेना आणि मुस्लिम लीग हे हाडवैरी असताना त्यांनी एका व्यासपीठावर एकत्रित राजकीय सभा घेतल्याचे दिसते. बाळासाहेब ठाकरे आणि मुस्लिम लीगचे नेते बनातवाला यांची संयुक्त जाहीर सभा दक्षिण मुंबईतील मस्तान तलाव येथे झाली. संयुक्त सभेचे रूपांतर मोर्चात झाले. विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला. एकत्रच मोर्चा सभा झाली होती. एकंदरीतच उपरोक्त सर्व मुद्द्यांच्या आधारे 1995 पूर्वी शिवसेनेच्या एकूणच वाटचालीवर संशोधनात्मक प्रकाश टाकल्यास आपणांस शिवसेनेचे विविध बदलते मुखडे पहावयास मिळतात. सध्या महाराष्ट्रात तीन राजकीय पक्षाचे आघाडी सरकार आहे. यामध्ये शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आहेत. हा एक अलिकडचा शिवसेनेचा मुखडा म्हणून पाहू शकतो. खरंतर राजकारणात कोणाचेही वावडे नसते असते म्हटले जाते. परंतू विविध राजकीय पक्ष ज्या विचारधारेवर उभे असतात त्या विचारधारेचे काय असा प्रश्न अभ्यासकांना पडल्याशिवाय राहणार नाही.

सदरील संशोधनपर अभ्यासाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शिवसेना या राजकीय प्रादेशिक पक्षाचा व त्याच्या मुखड्याचा संशोधनात्मक आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) जोशी मनोहर, *'शिवसेना काल आज आणि उद्या'*, प्रबोधन प्रकाशन, मुंबं, पृष्ट क्र. 03
2) कित्ता - (पूर्वोक्त) पृष्ट क्र.03
3) *अकोलकर प्रकाश, 'जय महाराष्ट्र'*, मनोविकास प्रकाशन, मुंबई, पृष्ट क्र.466
4) कित्ता - (पूर्वोक्त) पृष्ट क्र.116
5) *पुरंदरे वैभव, 'बाळ ठाकरे आणि शिवसेनेचा उदय'* मंजुल पब्लिशिंग हाऊस, भोपाळ, पृष्ट क्र.87